भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः दवसु-२०१८/प्र.क्र.३/अजाक

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
तारीख: २३ जानेवारी,२०१८

प्रस्तावना

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांना / गांवांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांची सुधारणा करण्याची योजना (पूर्वीची दलित वस्ती सुधार योजना) ही जिल्हा योजना या विभागांतर्गत कार्यरत आहे. तथापि, अनेक वस्त्यांमध्ये निधीअभावी विकास कामे प्रलंबित राहिल्याने अनेक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार राज्यस्तरावरुन त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांना निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना" ही राज्यस्तरीय योजना या विभागामार्फत कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित केले होते. या संदर्भात दिनांक २१ डिसेंबर,२०१७ रोजी नागपूर येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदर योजनेचा विषय चर्चेस आला असता राज्य मंत्रिमंडळाने "याबाबत मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यात यावी. तसेच सदर समितीस अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील" असे निदेश दिलेले आहेत.

शासन निर्णय

लोक प्रतिनिधींनी सुचविलेल्या मुलभूत सुविधांबाबतच्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्ती सुधारणा योजनेत अधिक सुस्पष्टता व सुसूत्रता यावी यादृष्टीने सन २०१७-१८ या वर्षापासून "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना" या नवीन प्रस्तावित राज्यस्तरीय योजनेबाबत निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात येत असून सदर समितीस अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील. सदर उपसमितीची रचना खालीलप्रमाणे आहे:

अनुक्रमांक	पदनाम	
१	अध्यक्ष	मा. मंत्री, महसूल
२	सदस्य	मा. मंत्री, अल्पसंख्याक विकास मा. मंत्री, ग्राम विकास मा. मंत्री, आदिवासी विकास मा. मंत्री, सामाजिक न्याय मा. राज्य मंत्री, सामाजिक न्याय
३	सदस्य सचिव	सचिव (सामाजिक न्याय)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२३१६३६१९४५२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh
Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.01.23 16:39:58 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र यांचे सचिव.
२. मा. मुख्य मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
४. मा. मंत्री, महसूल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
५. मा. मंत्री, अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
७. मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
९. मा. राज्य मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
१०. इतर सर्व मा. मंत्री व मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व राज्य सभा /लोक सभा सदस्य (महाराष्ट्र).
१२. सर्व विधानसभा / परिषद सदस्य.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई.
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -२, महाराष्ट्र, नागपूर.
१५. महालेखापाल (लेखापरिक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई.
१६. महालेखापाल (लेखापरिक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर.
१७. संचालक (लेखा व कोषागारे), लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. सर्व जिल्हाधिकारी.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा.
२०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२१. प्रादेशिक उप आयुक्त, समाजकल्याण विभाग, सर्व.
२२. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई.
२३. सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई.
२४. सचिव (सामाजिक न्याय) यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२५. सर्व सह सचिव/अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सर्व कार्यासने.
२७. निवड नस्ती, अजाक कार्यासन.